आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

शुक्रवार, दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४

ठळक बातम्या

1. 'पुढील वर्षापर्यंत  नक्षलग्रस्त जिल्हा अशी ओळख संपून गडचिरोली उद्योगनगरी म्हणून ओळखली जाईल'- उद्योग भरारी  कार्यक्रमात मंत्री उदय सामंत यांचं प्रतिपादन.
2. नागपुरात जागतिक दर्जाचं ब्राऊनफिल्ड विमानतळ उभारलं जाणार असल्याची उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांची माहिती.
3. पर्यटन माणसाला समृद्ध करतं - पर्यटन दिनाच्या कार्यक्रमात निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांचं  प्रतिपादन.
4. माहिती तंत्रज्ञानाच्या उत्कृष्ट वापरासाठी महावितरणला दोन राष्ट्रीय पुरस्कार.

**#####**

मंत्री उदय सामंत

पुढील वर्षापर्यंत गडचिरोली जिल्ह्याची नक्षलग्रस्त जिल्हा अशी ओळख पुसली जाणार असून, गडचिरोली उद्योग नगरी म्हणून ओळखली जाईल. मोठ्या प्रकल्पातंर्गत गडचिरोली जिल्ह्यातली ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ५० हजार कोटीपर्यंत जाणार असल्याचं प्रतिपादन, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी  आज, ‘उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी’ या कार्यक्रमात केलं.

महाराष्ट्रात सर्वप्रथम नागपूर इथं आयोजित या कार्यक्रमात, राज्यात होणारी गुंतवणूक आणि आर्थिक विकासाची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात बोलताना 'विदर्भातील औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यासाठी, ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याचं, सावंत यांनी सांगितलं.

मागच्या तीन महिन्यात एकट्या महाराष्ट्रात ७५ हजार कोटींची थेट परकीय गुंतवणूक झाली असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

महाराष्ट्रातील महिलांसाठी भूसंपादनाचे नियम शिथिल करण्यात आले असून, महिला उद्योजकांना जमीन देण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं.

अमरावती इथं टेक्सटाइल पार्क निर्माण होणार असून, तिथं कौशल्य केंद्र स्थापन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राची उद्योग भरारी हा कार्यक्रम नवीन

औद्यगिक धोरणाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास, त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

**#####**

ब्राऊनफिल्ड विमानतळ

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळ नागपुरातील जागतिक दर्जाच्या ब्राऊनफिल्ड विमानतळ उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हे विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे कार्गो विमानतळ सुद्धा असेल आणि दोन धावपट्ट्या असतील.

नागपूरचे हे नवे विमानतळ आपले स्वप्न होते आणि आपण सातत्यानं परिश्रम घेतले. यामुळे नागपूरचा मिहान प्रकल्प खऱ्या अर्थानं 'टेकऑफ' घेणार अशी माहिती, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आज समाज माध्यमावरून दिली.

**#####**

निवडणूक आयोग

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय निवडणूक आयोग मुंबईत विविध बैठक घेत आहे. यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयुक्त आणि आयोगाचे इतर अधिकारी कालच मुंबईत दाखल झाले आहेत. त्यांनी आज सकाळी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली.

दरम्यान, मतदानाचा दिवस सलग सुट्ट्यांच्या दिवशीचा असू नये, जर नोव्हेंबरमध्ये निवडणूक होणार असेल तर लोकसभेप्रमाणे वातावरणात गर्मी असू शकते. त्यामुळे रांगेत उभे राहणाऱ्या मतदारांना उभे राहण्यासाठी शेड, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, सोबत मोबाईल आणि बॅंग ठेवण्यासाठी टोकन सुविधा असावी, दिड हजार मतदारामागे एक बुथ ऐवजी कमी मतदार संख्येचा बुथ असावा आदी सूचना, भाजप आमदार अॅड.आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे मांडल्यात.

दरम्यान, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला याना पदावरून हटविण्याचे पत्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना लिहिलं आहे.

**#####**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून, राज्यातील एक कोटी ९० लाख बहीणींच्या बँक खात्यात योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित साठ लाख महिलांना लवकरच लाभ दिला जाईल. एकाही भगिनीला, दिवाळीत भाऊबीजेच्या ओवाळणीपासून वंचित ठेवलं जाणार नाही अशी ग्वाही, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

शिर्डी इथं मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत आयोजित महामेळाव्या प्रसंगी उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला महसूल, पशूसंवर्धन, दूग्ध व्यवसाय विकासमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.

**#####**

नेमणूक

संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी, भर्तुहरी महताब यांची तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी, शशी थरूर यांची नेमणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री राधा मोहन सिंग हे संरक्षण विषयक तर राधा मोहन दास अग्रवाल गृहविषयक समितीचे अध्यक्ष राहणार आहे. सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, श्रीरंग बारणे यांची ऊर्जा विषयक समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे.

**#####**

दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २९ सप्टेंबरला, पुण्यातल्या शिवाजीनगर ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचं दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण होणार आहे. स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाचं भुमिपूजनही, यावेळी होणार आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. मुसळधार पावसामुळ पंतप्रधानांचा कालचा पुणे दौरा रद्द करण्यात आला होता.

**#####**

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून, देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीचा हा चौथा भाग असून, आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम प्रसारित होईल.

**#####**

पर्यटन दिन

जागतिक पर्यटन दिन आज साजरा होत असून, लोकांना परस्परांशी जोडण्यामध्ये आणि अर्थव्यवस्थांना चालना देण्यामध्ये पर्यटनाची असलेली भूमिका अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस पाळण्यात येतो. 'पर्यटन आणि शांतता' ही यंदाच्या पर्यटन दिनाची संकल्पना आहे. भविष्यातल्या पिढ्यांसाठी अधिक शाश्वत आणि न्याय्य पर्यटन उद्योगाला चालना देणं हा, या दिवसाचा उद्देश आहे. पर्यटन मंत्रालयातर्फे आज नवी दिल्ली इथं

विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन झालं.
पर्यटनामुळ नवीन संस्कृती, परंपरा, पदार्थांची ओळख होते. नवीन माणसे भेटतात. त्यांचे अनुभव कळतात. नवीन वातावरण आणि अनुभवांमुळे चैतन्य आणि उत्साह निर्माण होतो. पर्यटन माणसाला समृद्ध करतं असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांनी केलं.

जागतिक पर्यटन दिनाचं औचित्य साधून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळच्या प्रादेशक कार्यालय, नागपूर तर्फे आज पत्रकार क्लब इथं विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर होते.
यावेळी एम.टी.डी.सी.तर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरीत करण्यात आलं. तसंच पर्यटनाशी निगडीत क्षेत्रात काम करणा-या व्यक्तींचा, सत्कार करण्यात आला.

**#####**

महावितरण
माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे वीज ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे आणि दर्जेदार ग्राहक सेवेसाठी प्रभावी धोरणात्मक उपक्रम राबविल्याबद्दल महावितरणला द गव्हर्नन्स नाऊ या संस्थेतर्फे दोन प्रवर्गात राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आले. काल नवी दिल्ली इथं हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.
उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या कामकाजात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून ग्राहकांना पारदर्शक आणि गतिमान सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महावितरणकडून माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.
या अंतर्गत ग्राहक सेवेत अधिक सुलभता आणणाऱ्या ऊर्जा चॅटबॉट आणि ईव्ही मोबाईल ॲपसाठी महावितरणला हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.
राष्ट्रीय पातळीवरील हे दोन्ही पुरस्कार महावितरणतर्फे माहिती तंत्रज्ञान महाव्यवस्थापक एकनाथ चव्हाण यांनी स्वीकारले.

**#####**

रोहिदास चुडामण निधन
माजी मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास चुडामण पाटील यांचं आज धुळे इथं वार्धक्यानं निधन झालं, ते ८४ वर्षांचे होते. पाटबंधारे आणि अन्य खात्यांचं मंत्रिपद भूषवलेल्या रोहिदास पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत अक्कलपाडा आणि अन्य प्रकल्प पूर्णत्वास नेले.

काँग्रेस पक्षातही अनेक पदं त्यांनी भूषवली. त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत. पाटील यांच्या निधनाबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड इत्यादी मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**#####**

'महाविजय संवाद'

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं, 'महाविजय संवाद' या राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली आहे. शिवसेनेच्या युवा सेना, महिला आघाडी आणि शिवसेना सोशल मीडिया या तीन विभागांकडून, राज्यभरात हे अभियान राबवलं जाणार आहे.

**#####**

पोषण महिना

केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या सातव्या राष्ट्रीय पोषण महिना उपक्रमा अंतर्गत, आतापर्यंत नऊ कोटी ६८ लाखांहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. यावर्षी राबवण्यात येत असलेल्या या अभियानात, महाराष्ट्र, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेश राज्यांनी चांगली कामगिरी केली.

पौष्टिक आहाराबरोबरच नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यावर भर देणारे उपक्रमही राबवल्याची, मंत्रालयानं दिली आहे.

**#####**

परसबाग गडचिरोली

पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत, २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यातल्या सर्व शाळांमधून परसबाग उपक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या परसबाग स्पर्धेत गडचिरोली जिल्ह्याच्या मुलचेरा तालुक्यातल्या उदयनगर बांग्ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परसबागेला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

येत्या रविवारी पुण्यात राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे आयोजित कार्यक्रमात शाळेला सन्मानित करण्यात येणार आहे.

**#####**

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अमरावती आणि अकोल्यासाठी आज मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज सकाळी नागपुरात पावसानं हजेरी लावली.

उद्या देखील नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा आणि वर्धा जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहू शकतं.

**#####**